सत्याचा आवाज जनतेच्या नजरेतून

दैनिक

# महाराष्ट्र वार्ता

मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, पालघर येथे एकाच वेळी प्रकाशित

वर्ष- १ | अंक- ३१० | आर एन आय क्र. MHMAR/25/A0849 | आवृत्ति : ठाणे | सोमवार, १० ऑगस्ट २०२६ | संपादिका : सौ. नम्रता गोसावी | पृष्ठे-४ | किंमत २ रु.

## मुंबईत BRICS फ्रेंडशिप सिटीज कॉन्क्लेव्ह 2026; जागतिक शहरांचे नेते, तज्ज्ञ एकत्र येणार

**मुंबई : नम्रता गोसावी**

शहरी विकास, पर्यावरण आणि भविष्यातील शहरांच्या आव्हानांवर आंतरराष्ट्रीय स्तरावर विचारमंथन करण्यासाठी BRICS फ्रेंडशिप सिटीज कॉन्क्लेव्ह 2026 चे आयोजन मुंबईत 11 आणि 12 ऑगस्ट रोजी करण्यात आले आहे. मुंबईतील फोर सीझन्स हॉटेल येथे होणाऱ्या या दोन दिवसीय परिषदेत BRICS देशांतील शहरांचे प्रतिनिधी, धोरणकर्ते, प्रशासकीय अधिकारी आणि शहरी विकास क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांच्या हस्ते 11 ऑगस्ट रोजी परिषदेचे उद्घाटन होणार असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेयांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार




आहेत.मुंबई फर्स्ट या विचारमंचाच्या पुढाकाराने, महाराष्ट्र सरकार आणि भारत सरकारच्या सहकार्याने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत सुमारे 15 शहरांचे प्रतिनिधित्व राहणार असून ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका, इजिप्त, इराण आणि इंडोनेशिया या देशांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.दोन दिवसांत सहा सत्रांमध्ये लवचिकता (Resilience), नवकल्पना (Innovation), सहकार्य (Cooperation) आणि शाश्वतता (Sustainability) या विषयांवर चर्चा होणार आहे. हवामान बदलामुळे निर्माण होणारी शहरी आव्हाने, किनारपट्टीचे संरक्षण, शहरांचे तापमान कमी करणे, स्वच्छ हवा, परवडणारी घरे, कमी-कार्बन वाहतूक तसेच शहरी प्रशासनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर** या महत्त्वाच्या विषयांवर विचारमंथन होणार आहे.मुंबई फर्स्टचे अध्यक्ष नरेंद्र नायर यांनी सांगितले की, ही परिषद केवळ चर्चेपुरती मर्यादित न राहता पायाभूत सुविधा, वाहतूक, गुंतवणूक आणि नवकल्पनांच्या क्षेत्रात प्रत्यक्ष भागीदारी निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरेल.

मुंबई फर्स्टचे उपाध्यक्ष अशांक देसाई यांनी सांगितले की, विविध देशांतील शहरांना एकत्र आणून त्यांच्या अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी ही परिषद महत्त्वाची ठरणार आहे. 2016 मध्ये भारताच्या BRICS अध्यक्षतेदरम्यान मुंबई फर्स्टने अशाच प्रकारची पहिली परिषद आयोजित केली होती.मुंबई फर्स्टचे उपाध्यक्ष रॉजर परेरा यांनी नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तींचा सामना करण्यासाठी विविध देशांनी केलेल्या उपाययोजनांमधून एकमेकांनी शिकण्याची गरज व्यक्त केली. विशेषतः स्वच्छ हवेच्या उपाययोजनांमध्ये चीनने केलेल्या कामाचा इतर देशांना फायदा होऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले.

BRICS फ्रेंडशिप सिटीज कॉन्क्लेव्हला वार्षिक व्यासपीठाचे स्वरूप देण्याचा आयोजकांचा मानस असून, शहरांमध्ये दीर्घकालीन सहकार्य, ज्ञानाची देवाणघेवाण आणि संस्थात्मक भागीदारी वाढविण्यावर भर दिला जाणार आहे.

## 'मिस शी इंडिया 2027'चा दिमाखदार शुभारंभ; देशभरातील प्रतिभांना मिळणार मोठे व्यासपीठ

### 23 शहरांतील 15 हजारांहून अधिक स्पर्धक सहभागी होण्याची अपेक्षा; फेब्रुवारीत हैदराबादमध्ये ग्रँड फिनाले



**मुंबई, :** देशातील फॅशन, मनोरंजन आणि क्रिएटिव्ह क्षेत्रातील नव्या प्रतिभांना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हैदराबादस्थित ग्रेडिएंट इन्फोटेनमेंट ने 'मिस शी इंडिया 2027' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची सुरुवात केली आहे.सुमारे सहा महिने चालणाऱ्या या उपक्रमात देशातील 23 शहरांमधून 15 हजारांहून अधिक प्रतिभावंत सहभागी होण्याची अपेक्षा आहे. मुंबईतील हॉटेल सहारा स्टार येथे आयोजित कार्यक्रमातून 'ग्रेडिएंट एशियन फॅशन टूर'च्या 25व्या सीझनलाही सुरुवात झाली. यावेळी सहभागी स्पर्धकांनी रॅम्पवर आत्मविश्वास आणि फॅशन स्टाइलचे दर्शन घडवले. स्पर्धेचा ग्रँड फिनाले फेब्रुवारीमध्ये हैदराबाद येथे होणार असून तेथे विजेत्याची निवड केली जाणार आहे.ग्रेडिएंट इन्फोटेनमेंटचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक डॉ. विमल माथुर यांनी सांगितले की, 'मिस शी इंडिया 2027' ही केवळ सौंदर्य स्पर्धा किंवा रॅम्प शो नसून भारताच्या क्रिएटिव्ह इकॉनॉमीला आणि महिला प्रतिभांना प्रोत्साहन देणारा उपक्रम आहे. देशभरातील प्रतिभांना जागतिक स्तरावरील संधी उपलब्ध करून देण्याचा कंपनीचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

निवड झालेल्या प्रतिभांना पुढील काळात बॉलिवूड, ओटीटी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ब्रँड एंडोर्समेंट तसेच परदेशातील फॅशन शोजमध्ये काम करण्याच्या संधी उपलब्ध करून देण्याची योजना आहे. तसेच सहभागींसाठी मेंटरशिप आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक्सपोजरचीही व्यवस्था केली जाणार आहे.

या उपक्रमाची विशेष बाब म्हणजे स्पर्धा विजेत्यांना मुकुट मिळाल्यानंतर संपणार नसून, त्यांच्यासाठी करिअरच्या नव्या संधींचे दरवाजे खुले करण्यावर भर दिला जाणार आहे. भविष्यात निवडक प्रतिभांना मिलानसारख्या आंतरराष्ट्रीय फॅशन मंचांवरही संधी मिळू शकते.ग्रेडिएंट इन्फोटेनमेंट प्रॉडक्शन, मनोरंजन, जाहिरात, ब्रँडिंग, पीआर आणि फिल्म कंटेंट निर्मितीसह व्हीएफएक्स, डबिंग आणि एडिटिंग क्षेत्रात कार्यरत आहे. कंपनीने क्रिएटिव्ह आणि ऑरेंज इकॉनॉमीला चालना देण्यासाठी 5,000 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची घोषणा ही केली आहे.

## राज्यात १३ ऑगस्टपासून पावसाचा जोर पुन्हा वाढणार

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली होती. मात्र, आता हवामानात पुन्हा बदल होण्याचे संकेत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढू शकतो. १३ ते २० ऑगस्ट या काळात विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता आहे. तसेच २० ते २७ ऑगस्ट दरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये पाऊस सुरूच



राहण्याची शक्यता आहे, असे ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितले आहे. हवामान विभागाने हवामानासंबंधित एक महत्त्वपूर्ण अंदाज जाहीर केला आहे. येत्या २४ तासांत बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याचा इशारा दिला आहे. तसेच चालू महिन्यात महाराष्ट्रात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दक्षिण पश्चिम बंगाल आणि त्याला लागून असलेल्या बांगलादेशच्या आकाशात चक्राकार वारे वाहत आहेत. या कारणामुळे पुढील २४ तासांत पश्चिम बंगालची किनारपट्टी आणि वायव्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होणार आहे. दरम्यान, पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या महाबळेश्वरमध्ये मागील २४ तासांत ८२.५ मि.मी. पाऊस पडला आहे. तर या हंगामात एकूण ५ हजार १६ मि.मी. पाऊस नोंदविण्यात आला आहे.

## कुंभमेळ्याच्या कामात दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही- मुख्यमंत्री फडणवीस




**मुंबई :** नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याची तारीख निश्चित असून, सर्व विभागांनी विकास आरखड्यातील कामे नियोजित वेळेत, गुणवत्तापूर्ण आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करावीत. कामे पुढे ढकलण्याची वृत्ती दूर करुन कुंभमेळ्याच्या ३४ हजार ७३२ कोटी रुपयांच्या विकास आरखड्यातील कामांना गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार देवयानी फरांदे, सीमा हिरे, राहुल ढिकले, सरोज अहिरे, हिरामण खोसकर, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर, नगराध्यक्ष त्रिवेणी तुंगार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यासह वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, सध्याची कुंभमेळ्यातील कामांची परिस्थिती समाधानकारक नसून प्रत्येक विभागाने अधिक वेगाने आणि समन्वयाने काम करण्याची गरज आहे. बैठकीत देण्यात आलेल्या सर्व सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी. एक महिन्यानंतर पुन्हा आढावा बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीपर्यंत कामामध्ये गुणात्मक आणि प्रत्यक्ष प्रगती दिसली पाहिजे. त्यामुळे पुढील बैठकीची तयारी आजपासूनच सुरू करावी. बैठकीत १२ कोटी भाविकांच्या सुरक्षित व सुलभ दर्शनासाठी वाहतूक, निवास, स्वच्छता, आपत्ती व्यवस्थापन आणि डिजिटल सुविधा याबाबत सविस्तर नियोजन सादर करण्यात आले, त्याबाबत ते म्हणाले, नाशिक रिंग रोड, साधुग्राम उभारणी, रेल्वे स्थानकांचा विकास, ४,५०० विशेष एसटी बसेस तसेच विस्तृत पार्किंग व्यवस्थेची कामे गतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा. मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'डिजिटल कुंभ' संकल्पनेअंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता, 'कुंभदूत' एआय सहाय्यक, डिजिटल ट्विन, स्मार्ट पार्किंग, हरवलेल्या व्यक्तींचा शोध, तसेच एकात्मिक कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या माध्यमातून गर्दी आणि सुरक्षा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याचे निर्देश दिले.

## गौरी–गणपतीसाठी एसटीच्या जादा बसेस

**मुंबई :** कोकणातील गौरी-गणपती उत्सवासाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणावर चाकरमानी आणि भाविक आपल्या मूळ गावी जातात. यंदाही प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एमएसआरटीसी) विशेष नियोजन केले आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिलेल्या माहितीनुसार, 7 सप्टेंबर ते 25 सप्टेंबर या कालावधीत राज्यभरातून कोकणासाठी 5220 जादा एसटी बसेस सोडण्यात येणार आहेत. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात प्रवाशांना अधिक सोयीस्कर, सुरक्षित आणि नियोजनबद्ध प्रवास करता येणार आहे. गणेशोत्सवाच्या काळात मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पालघर, पुणे, नाशिक आणि इतर शहरांतून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. ही अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन एसटी महामंडळाने विशेष बसफेऱ्यांचे नियोजन केले आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि कोकणातील इतर महत्त्वाच्या मार्गांवर जादा बसेस उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामुळे तिकीटांची कमतरता, लांब प्रतीक्षा आणि शेवटच्या क्षणी होणारा प्रवासाचा ताण कमी होण्यास मदत होईल.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचं एमडीने वाटोळ केलं

**नवी मुंबई :** मराठा समाजासाठी असलेले अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचं व्यवस्थापकीय संचालक विजयसिंग देशमुख यांनी वाटोळं केल्याचा आरोप महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केला. हा व्यवस्थापकीय संचालक सरकारला अडचणीत आणत आहे, मराठा समाजाचे नुकसान करत आहे, असे आरोप नरेंद्र पाटील यांनी केले आहेत. सरकारला बदनाम करण्याचं काम हा अधिकारी करत असून त्याची तक्रार आपण मुख्यमंत्र्यांकडे केली असल्याचंही नरेंद्र पाटील म्हणाले.



महामंडळाच्या अध्यक्षाकडे काही अधिकार नाहीत, आमचे हात बांधले असल्याचं नरेंद्र पाटील म्हणाले. तसेच नरेंद्र पाटील यांनी महामंडळाचे अध्यक्षपद सोडण्याचे संकेत दिले आहेत.

एक व्यवस्थापकीय संचालक शासनाचे नुकसान करत असेल तर शासनाने त्यावर कारवाई करण्याची गरज असल्याचं नरेंद्र पाटील म्हणाले. यांच्या पाठीशी कुणीतरी आहे, त्यांना शासनाला यांच्या माध्यमातून बदनाम करायचे आहे असाही आरोप नरेंद्र पाटील यांनी केला. एमडीने प्रमाणपत्र देताना अटी सांगितल्या, कर्ज देताना उत्पन्नाची अट घातली. या अटीशर्तीमुळे मराठा समाज मागे पडला, असं नरेंद्र पाटील म्हणाले.

एमडीच्या मनमानी कारभाराचा फटका मराठा समाजाला बसला असून त्यामुळे अनेकांना कर्ज मिळू शकले नाही. 2024-25 साली अनेक प्रमाणपत्रं रद्द करण्यात आली. शासनाच्या विरोधात लोकांमध्ये रोष निर्माण करण्याचे काम महामंडळाचे एमडी करत आहेत. या मुळे मराठा समाज नाराज झाला आहे. याबाबत मराठा समाजाने मुख्यमंत्र्यांसोबत बैठकीची मागणी केली आहे.

विजयसिंग देशमुख हे एमडी आहेत, त्यांना सरकारला अडचणीत आणण्यासाठी कुणीतरी सुपारी दिली असल्याचं आम्हाला वाटतंय. याबाबत आपण मुख्यमंत्री आणि राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे तक्रार केली आहे, अशी माहिती नरेंद्र पाटील यांनी दिली.

महामंडळाचे एमडी अध्यक्षाला विचारात न घेता काम करतात हे स्पष्ट आहे. अध्यक्षपद आता शोभेचे राहिले आहे याचे आम्हाला वाईट वाटतंय. आमचे हात बांधले आहेत, हे पद ठेवून करू काय? मी आता महामंडळाची सेवा वापरात नाही, त्यामुळं आता मला पद सोडावे लागेल असे दिसतेय, असं नरेंद्र पाटील म्हणाले.

## पूनम रामटेके यांचे पहिले प्लेबॅक गाणे प्रदर्शित; संगीत क्षेत्रातील वाटचालीला नवी झेप



**मुंबई :** रॉयल इव्हेंट्सच्या संस्थापिका, गायिका आणि सेलिब्रिटी आर्टिस्ट पूनम रामटेके यांच्या संगीत प्रवासातील महत्त्वाचा टप्पा नुकताच गाठला असून, त्यांचे पहिले प्लेबॅक गाणे प्रदर्शितझाले आहे. त्यांच्या या नव्या यशामुळे संगीत क्षेत्रात त्यांच्या कारकिर्दीला नवी दिशा मिळाली आहे. प्रतिष्ठित 'सोलफुल गीतमाला' म्युझिकल ग्रुपच्या सदस्या असलेल्या पूनम रामटेके यांनी गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या मधुर आवाजाने विविध स्टेज शो आणि संगीत कार्यक्रमांमधून रसिकांची मने जिंकली आहेत. गायनासोबतच त्या रॉयल इव्हेंट्सच्या माध्यमातून कार्यक्रम आयोजन क्षेत्रातही कार्यरत आहेत.पूनम यांच्या मेहनत, शिस्त, वेळेचे भान आणि कलेप्रती असलेल्या निष्ठेची दखल घेत सक्षम म्युझिकल ग्रुपने डिसेंबर २०२६ पर्यंत त्यांच्या स्टेज शोसाठी गायनाचे कॉन्ट्रॅक्ट दिले आहे. त्यामुळे त्यांच्या व्यावसायिक संगीत कारकिर्दीला आणखी मोठी चालना मिळणार आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल सामाजिक कार्यकर्ते दिलीप देसाई आणि सोलफुल गीतमालाचे मुख्य प्रशासक प्रसाद पटन यांनी पूनम रामटेके यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.पूनम यांचे पहिले प्लेबॅक गाणे Spotify, Apple Music, JioSaavn, Gaana आणि YouTube यांसह प्रमुख डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झाले आहे. त्यांच्या या यशामुळे नवोदित कलाकारांना देखील प्रेरणा मिळणार असून, आगामी काळात त्या संगीत क्षेत्रात आणखी उल्लेखनीय कामगिरी करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या जमिनीवर वन विभागाच्या नोंदी कायम

**मुंबई :** घोडबंदर मार्गावरील भाईंदरपाडा-ओवळे येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या ताब्यातील १ हजार ५३ एकर वनजमिनीवरील वन विभागाचा हक्क कायम ठेवण्यात आला आहे. या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर 'महाराष्ट्र शासन राखीव वने' तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची नोंद कायम ठेवण्याचा अंतिम आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे.

महसूलमंत्र्यांच्या या निर्णयामुळे संबंधित वनजमीन खासगी हस्तांतरणापासून सुरक्षित राहणार असून, जमिनीवरील अनिर्बंध विकास आणि मोठ्या बांधकामांना प्रतिबंध राहणार आहे. या निर्णयाबद्दल वनमंत्री गणेश नाईक



यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे अभिनंदन केले. या निर्णयामुळे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतचा महत्त्वाचा हरित पट्टा आणि वनक्षेत्र अबाधित राहणार असून, वनाची जमीन वनालाच राहिली पाहिजे, ही राज्य सरकारची भूमिका पुन्हा अधोरेखित झाली आहे, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

महसूल न्यायालयात पार पडलेल्या सुनावणीतील आदेशानुसार, घोडबंदर मार्गावरील भाईंदरपाडा (ओवळे) येथील जुना सर्व्हे क्र. २९१ पैकी (नवीन स.क्र. २२/१, २२/४, २२/५) आणि जुना सर्व्हे क्र. २९७ पैकी (नवीन स.क्र. २१) अशी एकूण १,०५३ एकर जमीन १९७५ पासून वन विभागाच्या ताब्यात असून सातबारा उताऱ्यावर 'महाराष्ट्र शासन राखीव वने' अशी नोंद होती. या जमिनीवर खासगी खातेदारांचे (संदीप रतनलाल माखेचा व इतर) नाव दाखल करणारी विवादित फेरफार नोंद क्र. ९७५ ही अपर विभागीय आयुक्त (कोकण विभाग) यांच्या ११ जानेवारी २०१९ च्या निर्णयान्वये कायम झाली होती.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची जमीन खासगी लोकांच्या घशात घातली जात असल्याच्या बातम्या वस्तुस्थितीला धरून नव्हत्या. सरकारचा कधीही वनजमीन खासगी व्यक्तींना देण्याचा उद्देश नव्हता. अंतिम अर्धन्यायीक आदेशाद्वारे जमिनीच्या हस्तांतरणावर आणि वापरावर शासनाचे नियंत्रण कायम राहील, तसेच वन विभागाचा हक्क कायम ठेवत मोठ्या प्रमाणावरील बांधकामांना प्रतिबंध करण्यात आला आहे.

*** चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री, महाराष्ट्र**

## संपादकिय

# ‘यूपीआय’ सशुल्क होणार?

अतिशय लोकप्रिय बनलेले युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) प्रणालीद्वारे होणा-या व्यवहारांवर प्रक्रिया शुल्क आकारणीच्या (मर्चंट डिस्काऊंट रेट-‘एमडीआर’) दिशेने केंद्र सरकारने पाऊल टाकले आहे असे दिसते. या संदर्भात सरकारने मांडलेले कर दुरुस्ती विधेयक गुरुवारी लोकसभेत प्रचंड गदारोळात मंजूर झाले. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टीम कायदा दुरुस्ती विधेयक लोकसभेत मांडले. या विधेयकाला चर्चेविना आवाजी मतदानाने मंजुरी देण्यात आली. ऑनलाईन व्यवहारांवर सेवा पुरवठादार बँका आणि देयक कंपन्यांना शुल्क आकारणी करण्यास असलेली मनाईची तरतूद या विधेयकाद्वारे रद्द करण्यात आली आहे. आरटीजीएस आणि एनईएफटी व्यवहारांवर सध्या शुल्क आकारणी केली जाते. मात्र, यूपीआय आणि रुपे कार्ड व्यवहारांवर सध्या शुल्क आकारणी केली जात नाही. मंजूर विधेयकामुळे या व्यवहारांवर शुल्क आकारणीची वाट आता मोकळी झाली आहे.

प्रक्रिया शुल्क आकारणी करण्यासाठी या विधेयकामुळे सरकारला कायदेशीर बदल करता येणार आहे. ग्राहक आणि छोट्या व्यवसायांना डिजिटल व्यवहारांवर अल्प शुल्क आकारणी करून बँका आणि देयक सेवा पुरवठादार कंपन्यांना शाश्वत महसुलाचे साधन उपलब्ध करून देण्याचा सरकारचा यामागे हेतू आहे. डिजिटल देयक परिसंस्था चालविणा-या कंपन्यांनाही यातून महसुलाचा स्त्रोत उपलब्ध होणार आहे. यूपीआयच्या माध्यमातून जुलैमध्ये २३.६ अब्ज व्यवहार झाले असून, ते एकूण २९.९ लाख कोटी रुपयांचे आहेत. या कर आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक २०२६ चा मुख्य उद्देश देशात विदेशी गुंतवणुकीला गती देणे आणि ‘मेक इन इंडिया’ उपक्रमांतर्गत इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाला मोठे प्रोत्साहन देणे हा आहे. जागतिक पातळीवर बदलणा-या आर्थिक आणि पुरवठा साखळीच्या पार्श्वभूमीवर, उद्योगक्षेत्रात गुंतवणूक वाढवून ‘ईज ऑफ डुईंग बिझनेस’ला चालना देण्याची सरकारची योजना आहे. यासाठी हे विधेयक प्राप्तिकर कायदा २०२५, वित्त कायदा तसेच ‘पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टम ॲक्ट’, २००७ मध्ये आवश्यक बदल प्रस्तावित करते. या सुधारणांमुळे सर्वसामान्यांच्या थेट प्राप्तिकरात कोणताही बदल होणार नाही. मात्र, फॉरेन पोर्टफोलिओ इन्व्हेस्टर्सना (एफपीआय) सरकारी रोख्यांमधील गुंतवणुकीवरील व्याज आणि कॅपिटल गेन्सवर करात सवलत मिळण्याची शक्यता आहे. यामुळे देशात मोठा विदेशी निधी येऊन नवीन उद्योगांसोबतच रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील. या विधेयकातील ‘पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टम्स ॲक्ट’च्या कलम १० ए मध्ये दुरुस्तीचा प्रस्ताव ठेवला आहे. सध्याच्या कायद्यानुसार बँका आणि पेमेंट सेवा पुरवठादार (पीएसपी) यांना यूपीआय आणि रुपे डेबिट कार्ड व्यवहारांवर एमडीआर आकारता येत नाही. प्रस्तावित दुरुस्तीनंतर ही कायमस्वरूपी सवलत हटवली जाईल. त्याऐवजी केंद्र सरकार वेळोवेळी अधिसूचना काढून कोणत्या इलेक्ट्रॉनिक पेमेंटवर शून्य एमडीआर राहील आणि कोणत्या व्यवहारांवर मर्चंट शुल्क लागू होईल, हे ठरवू शकेल. मर्चंट डिस्काऊंट रेट (एमडीआर) म्हणजे डिजिटल व्यवहार प्रक्रिया करण्यासाठी व्यापा-यांकडून बँका आणि पेमेंट सेवा कंपन्यांना दिले जाणारे शुल्क सध्या भारतात क्रेडिट कार्ड व्यवहारांवर सुमारे १.५ टक्के, तर डेबिट कार्ड व्यवहारांवर ०.९ टक्क्यांपर्यंत एमडीआर आकारला जातो. मात्र यूपीआय व्यवहारांवर सध्या कोणतेही एमडीआर लागू नाही. यूपीआय व्यवहारांमध्ये सातत्याने विक्रमी वाढ होत आहे. जुलै महिन्यात यूपीआयद्वारे २३.६ अब्ज व्यवहार झाले असून त्यांची एकूण किंमत २९.९ लाख कोटी रुपये इतकी होती. फोन पे आणि गुगल पे यासारख्या प्लॅटफॉर्मचा या व्यवहारांमध्ये मोठा वाटा आहे. पेमेंट उद्योगाशी संबंधित कंपन्यांचे म्हणणे आहे की, यूपीआय व्यवहारांवर कोणतेही शुल्क मिळत नसल्यामुळे पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि सेवांमध्ये गुंतवणूक करणे अधिक कठीण होत आहे. त्यामुळे या क्षेत्राच्या दीर्घकालीन विकासासाठी एमडीआर आवश्यक असल्याचा उद्योगाचा दावा आहे. सरकार सध्या दोन प्रमुख पर्यायांवर विचार करत असण्याची शक्यता आहे.


पहिले म्हणजे ठराविक मर्यादेपेक्षा जास्त रकमेच्या यूपीआय व्यवहारांवर एमडीआर लागू करणे आणि दुसरे म्हणजे, व्यापा-याच्या वार्षिक उलाढालीच्या आधारावर शुल्क आकारणे. एका अंदाजानुसार, वार्षिक दीड कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या व्यापा-यांकडे दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या यूपीआय व्यवहारांवर ०.३ ते ०.५ टक्के एमडीआर आकारण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. मात्र लहान व्यापारी आणि सामान्य ग्राहकांसाठी यूपीआय व्यवहार पूर्वीप्रमाणेच विनाशुल्क ठेवण्याचा प्रस्तावही सरकारसमोर आहे. सध्या तरी सामान्य ग्राहकांसाठी कोणतेही शुल्क लागू करण्याचा निर्णय झालेला नाही. प्रस्तावित बदलांचा मुख्य भर मोठ्या व्यापा-यांवरील एमडीआरवर असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे लहान व्यापारी आणि सर्वसामान्य यूपीआय वापरकर्त्यांवर तात्काळ आर्थिक भर पडण्याची शक्यता कमी मानली जात आहे. ब्रोकरेज संस्थांच्या अंदाजानुसार दोन हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेचे व्यवहार व्यापारी पेमेंटच्या एकूण मूल्यांपैकी सुमारे ६७ टक्के आहेत. या व्यवहारांवर एमडीआर लागू झाल्यास डिजिटल पेमेंट उद्योगाला सुमारे दहा हजार कोटी रुपयांचे अतिरिक्त वार्षिक उत्पन्न मिळू शकते. विधेयक संसदेत मंजूर झाले तरी लगेच दुस-या दिवशीपासून यूपीआयवर शुल्क लागू होणार नाही. हा केवळ एक कायदेशीर बदल आहे. ज्याद्वारे सरकारला निर्णय घेण्याचे अधिकार मिळतील. सर्वसामान्य ग्राहकांसाठी सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, एमडीआर हा मर्चंट चार्ज असतो. म्हणजेच तुम्ही जेव्हा दुकानदाराला यूपीआयने पैसे देता, तेव्हा तुमच्या बँक खात्यातून कोणतेही अतिरिक्त पैसे कापले जात नाहीत. हा खर्च दुकानदाराला किंवा व्यापा-याला उचलावा लागतो. मात्र, अप्रत्यक्षपणे याचा फटका ग्राहकांना बसू शकतो. कारण दुकानदारांना हा चार्ज द्यावा लागला तर ते वस्तूंच्या किमती किंचित वाढवू शकतात किंवा मिळणा-या ऑफर्स आणि सवलती कमी करू शकतात. तज्ज्ञांच्या मते, जर भविष्यात यूपीआयवर एमडीआर लागू झाला, तर त्याचा सर्वाधिक फटका लहान व्यावसायिक आणि किराणा दुकानदारांना बसू शकतो. अतिरिक्त खर्च टाळण्यासाठी हे लहान दुकानदार ग्राहकांकडून क्यूआर कोड ऐवजी रोख रकमेची मागणी करू शकतात. त्यामुळे देशातील वाढत्या डिजिटल पेमेंटच्या गतीला काही प्रमाणात ब्रेक लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# शाळा बंदी + शिक्षक बंदी = शिक्षण बंदी

देशातील ९० हजार आणि महाराष्ट्रातील १८ हजार सरकारी शाळा बंद होणार असल्याची माहिती शासनानेच जाहीर केली. जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या २० पेक्षा कमी असल्याने राज्य सरकारने हा निर्णय घेतला. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले.

नव्या शैक्षणिक वर्षांत महाराष्ट्रातील अनेक शाळांमधील पटसंख्या कमी झाली आहे. अनेक जिल्ह्यांतील शाळांमध्ये पटसंख्या वीसपेक्षा कमी झाली आहे. यामुळे कमी पटसंख्या असलेल्या शाळा आता बंद केल्या जाणार आहेत. याबाबत राज्य सरकारकडून अधिवेशनात माहिती देण्यात आली असून राज्यातील १८ हजार शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी झाली आहे. राज्यात जिल्हा परिषदच्या एकूण १ लाख ८ हजार शाळा आहेत. त्यापैकी १८ हजार शाळांमध्ये २० पेक्षा कमी पटसंख्या असल्याची नोंद करण्यात आली आहे. २० पेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद केल्या जाणार आहेत. याउलट राज्यात आठ हजार गावांत शाळाच नाही, अशी धक्कादायक बातमी वृत्तपत्रांनी दिली आहे. समग्र शिक्षण अभियानाचा अर्थसंकल्प ठरवण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या शिक्षण विभागाची संयुक्त बैठक झाली. त्यात ‘युडायस’च्या आकडेवारीनुसार राज्यात ८ हजार २१३ गावांमध्ये शाळांची सुविधा नसल्याचे शिक्षण विभागाने विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मान्य केले आहे. १,६५० गावांमध्ये प्राथमिक, १६,५६३ गावे उच्च प्राथमिकविना शिवाय वीज, पाणी, स्वतंत्र शौचालयांचा अभाव राज्यातील ५ हजार ३७३ शाळांमध्ये, ५३० शाळांमध्ये पिण्याचे पाणी, ३ हजार ३३५ शाळांमध्ये मुलींसाठी, तर ५ हजार १२४ शाळांमध्ये मुलांसाठी स्वतंत्र शौचालय नसल्याचे स्पष्ट असताना या शाळांचे सबलीकरण करण्याऐवजी १८००० शाळा बंद करण्याचा घाट घातला जात आहे. १ हजार ६५० गावांमध्ये प्राथमिक शाळा, ६,५६३ गावांमध्ये उच्च प्राथमिक शाळा नसल्याचे निदर्शनास आले आहे, असे लेखी उत्तर शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिले आहे.

हे कमी की काय म्हणून कमी पटसंख्येच्या साडेचौदा हजार शाळांवर संक्रांत येणार आहे. कमी पटसंख्येच्या शाळांऐवजी आता समूह शाळांची निर्मिती करण्यासाठी धोरण निश्चित केले आहे. राज्यातील दुर्गम भागांमधील कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ‘क्लस्टर स्कूल’ (समूह शाळा) सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी नंदुरबार येथील तोरणमाळ व पुणे जिल्ह्यातील पानशेत या दोन क्लस्टर स्कूलच्या धर्तीवर राज्यात आता सर्व ठिकाणी क्लस्टर शाळा उभारल्या जाणार आहेत. परिणामी कमी पटसंख्येच्या तब्बल १४ हजार ७८३ शाळांवर संक्रांत येणार आहे.



शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्रत्येक मुलाला त्याच्या घराजवळ शिक्षण मिळणे अपेक्षित आहे. मात्र राज्यातील अतिदुर्गम भागात कमी पटसंख्या असणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नाही. त्यामुळेच राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने या विद्यार्थ्यांसाठी व त्यांना विविध शैक्षणिक साधनसामग्री उपलब्ध होण्यासाठी क्लस्टर स्कूल (समूह शाळा) सुरू करण्याचा उपक्रम हाती घेतला. त्यावर अनेक शिक्षण तज्ज्ञांकडून टीकाही झाली. मात्र क्लस्टर शाळा सुरू करण्याच्या निर्णयाला राज्य शासनाने हिरवा झेंडा दाखवला आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व इतर अभ्यास गटांनी सुचवलेल्या १८ पायाभूत सुविधा उपलब्ध असाव्यात, असे समूह शाळांबद्दल म्हटले जात असले तरी त्या सुविधा कितपत पूर्ण होतील हे सांगणे कठीण आहे. कमी पटसंख्येच्या शाळांमधून विद्यार्थ्यांना मोफत ने-आण करण्यासाठी शालेय बसची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. यासाठी विविध शासकीय निधी, सीएसआरचा वापर करावा. या प्रत्येक बसमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही, जीएसटी ट्रॅकरची सुविधा असावी व प्रत्येक बसमध्ये बिल्लाधारक चालक व महिला पर्यवेक्षक असावी, यासह इतरही सुविधा देण्याबाबत सुचविण्यात आले आहे, परंतु या सुविधा कागदावर राहतात की प्रत्यक्षात साकार होतात, याबाबतचे भाष्य करण्यासाठी कोणत्याही ज्योतिषाची गरज नाही.

क्लस्टरच्या माध्यमातून दहा किलोमीटर अंतरावर एक शाळासंकुल उभारण्याच्या सरकारच्या भूमिकेमुळे गावातील शाळा बंद होण्याची भीती असून राज्यभरातील १४ हजार ७८३ शाळा समायोजित (बंद) होण्याची शक्यता आहे. या निर्णयाचा परिणाम १ लाख ८० हजार विद्यार्थी आणि ३ हजार शिक्षकांवरही होणार आहे. हे विद्यार्थी ग्रामीण, आदिवासी पाडे, दुर्गम भाग व शहरी झोपडपट्टी यातील असणार आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे शिक्षण कायमचे बंद होण्याची शक्यता शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. ज्या गावची शाळा बंद होईल त्या गावातील विद्यार्थ्यांचे शिक्षण कायमचे बंद होण्याची शक्यता यामुळे निर्माण झाली आहे. कमी पटसंख्येच्या शाळा चालविणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही तसेच तेथील गुणवत्ता टिकवता येत नाही. त्यामुळे राष्ट्रीय शिक्षण धोरणात कमी पटसंख्येच्या शाळा समायोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहे, असा याबाबतचा सरकारचा युक्तिवाद आहे.

शिक्षणावरील खर्च कमी- मागील चार वर्षांत राज्य सरकारचे उत्पन्न वाढले, परंतु शिक्षणावरील खर्च १८.१ टक्क्यांवरून १६.३ टक्क्यांपर्यंत खाली आला. सतत खर्च कपातीमुळे शाळांची अवस्था बिकट झाली आहे. शिक्षकांची रिक्त पदे, भौतिक सुविधांचा अभाव, अशैक्षणिक कामातून सुटका खेळाचे मैदान व साहित्य त्यासाठी प्रशिक्षित शिक्षक आदींची पूर्तता होऊ शकली नाही. त्यामुळे या शाळा आपसूकच गुणवत्ताहीन झाल्या. आता त्या मरणासन्न अवस्थेत आहेत. बंद होण्याच्या मार्गावरील शाळांचे प्रमाण सर्वात जास्त विदर्भात आहे, त्या खालोखाल मराठवाड्यातील आहे. गोंदिया : २१३, भंडारा : १४१, नागपूर : ५५५, चंद्रपूर : ४३७, गडचिरोली : ६४१, वर्धा : ३१८, यवतमाळ : ३५०, अमरावती : ३१४, अकोला : ११३, वाशीम : १३३, हिंगोली : १३, नांदेड : ३१४, बुलडाणा : १५८, परभणी : १२६, लातूर : २०१, धाराशिव : १७४, जालना : १८४, बीड : ५३३, सोलापूर : ३४१, जळगाव : १०७ छत्रपती संभाजीनगर : ३४७, नगर : ६१५, नंदूरबार : १८१, बुळे : १२, पुणे : १०५४, ठाणे : ४४१, पालघर : ३१७, मुंबई : ११७, रायगड : १२१५, सातारा : १०३१, सांगली : ३८५० कोल्हापूर : ५०७, सिंधुदुर्ग : ८३५, रत्नागिरी : १३७५, नाशिक : ३३१ शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे, राष्ट्रीय शिक्षण धोरणाऐवजी राज्य सरकारने स्वतंत्र धोरण तयार करावे. शिक्षण खर्चात वाढ करावी तसेच शाळांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करून नियमित शिक्षकांची भरती करावी, असे मत शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. एकीकडे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण, किफायतशीर करिअरच्या संधी मिळाव्यात असे नमूद करायचे, पण दुसरीकडे नेमके याविरुद्ध व्यवहार करायचा, अशी सरकारची भूमिका दिसते. त्यामुळे या व्यवहाराचे दुर्गामी परिणाम आपल्या समाज व्यवस्थेवरती होतील यात शंका नाही.

# खरे बोलत असाल तर स्वागतच !

राजकीय पक्ष स्थापन न करता दबावगट म्हणून आगामी काळात समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडणार असल्याचे काल अभिजित दीपकेंनी जाहीर केले खरे. आता या शब्दांवर कायम राहणार असतील तर दीपकेंचे स्वागतच. पण, त्यांची कालची वक्तव्ये आणि संघटनेची दिशा पाहता, ‘दुसरा केजरीवाल’च देशात तयार होतोय का, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविकच!

कॉकरोच जनता पार्टी’ अर्थात, ‘सीजेपी’चे संस्थापक अभिजित दीपकेंनी काल पत्रकार परिषदेत संघटनेच्या राजकीय भवितव्याबाबत महत्त्वाची घोषणा केली. ‘आपण राजकीय पक्ष स्थापन करणार नाही, निवडणूक लढवणार नाही आणि ‘सीजेपी’ला देशव्यापी दबावगटाच्या स्वरूपात पुढे नेणार,’ असे दीपकेंचे म्हणणे. बेरोजगारी, खासगी शाळांमधील वाढते शुल्क, सरकारी शाळांची अवस्था आणि सार्वजनिक संस्थांवरील घटता विश्वास, यांसारख्या मुद्द्यांवर काम करणार असल्याचीही घोषणा त्यांनी केली. त्यासाठी ‘क्या बोलती पब्लिक’च्या माध्यमातून देशव्यापी सदस्य नोंदणीही जाहीर केली. खरं तर लोकशाहीमध्ये सत्ताधारी आणि विरोधी पक्षांइतकेच जागरूक नागरिक, सामाजिक संघटना आणि दबावगटही तितकेच आवश्यक. सरकारला प्रश्न विचारणे, व्यवस्थेतील त्रुटींवर बोट ठेवणे आणि तरुणांच्या समस्यांना वाचा फोडणे यात काहीही गैर नाही. उलट, अशी जागरूकता लोकशाही अधिक सशक्त करते. मात्र, त्यासाठी आंदोलनाचे स्वरूप, नेतृत्वाची जबाबदारी आणि घटनात्मक संस्थांविषयीची भूमिका या तीनही गोष्टी तितयाच स्पष्ट असायला हव्यात. मात्र, दीपके आणि ‘सीजेपी’च्या अजेंड्यापासून ते कार्यपद्धतीबाबत नेमके येथेच गंभीर प्रश्न उपस्थित होतात.

दिल्लीतील ‘सीजेपी’च्या आंदोलनाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या परीक्षा, पेपरफुटी आणि शिक्षणव्यवस्थेतील प्रश्नांवर झाली. हे प्रश्न रास्तच होते आणि त्यांची उत्तरे सरकारकडून मिळायलाच हवी होती. मात्र, आंदोलन जसजसे वाढत गेले, तसतसे परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे चित्र निर्माण झाले. ‘संसद चलो’ आंदोलनादरम्यान झालेल्या संघर्षात आंदोलक आणि सुरक्षा कर्मचारी मिळून १७०हून अधिक जण जखमी झाले. पोलिसांनी १५ ते २० सरकारी वाहनांसह सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड झाल्याचा आरोप केला आणि काही दंगेखोर आंदोलकांना ताब्यातही घेतले. याच ठिकाणी आंदोलनाच्या नेतृत्वाची जबाबदारी सुरू होते. विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी सुरू झालेल्या आंदोलनात मूळ विषयाशी संबंध नसलेली राजकीय, जातीधर्मांविरोधी आणि वैचारिक वक्तव्ये केली गेली, राष्ट्रीय प्रतीकांचा अवमान करणारे किंवा हिंदू धर्माच्या श्रद्धांचा अपमान करणारे सूरही उमटले. त्यामुळे लोकशाहीत आंदोलनाचा जसा अधिकार आहे, तसे ते आंदोलन संविधानिक मार्गाने पूर्णत्वास नेण्याची नैतिक जबाबदारीसुद्धा आंदोलकांचीच. पण, दीपके आणि टोळी त्याबाबतीत सपशेल नापासच ठरली.

विशेष म्हणजे, दिल्लीतील ‘सीजेपी’च्या आंदोलनाला केजरीवालांचा अपेक्षित पाठिंबाही लाभला. गेल्या दशकाच्या प्रारंभी अण्णा हजारेंच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनातून केजरीवाल राष्ट्रीय पटलावर आले. प्रारंभी सत्तेपासून दूर राहून व्यवस्था परिवर्तनाची आता जी भाषा दीपकेंच्या तोंडी आहे, तीच भाषा केजरीवालांच्याही तोंडी होती. पण, पुढे त्याच आंदोलनातून ‘आम आदमी पार्टी’ जन्मालाही आली आणि केजरीवाल दिल्लीचे मुख्यमंत्रीही झाले. अण्णा हजारेंचे आंदोलन ‘हायजॅक’ करत, सत्ता मिळविलेल्या केजरीवालांची विश्वासार्हता संपुष्टात आल्यानेच, दिल्लीकरांनी त्यांना नंतर सपशेल नाकारलेही. याच केजरीवालांच्या खांद्याला खांदा लावून काम केलेले दीपके ‘राजकीय पक्ष स्थापन करणार नाही आणि निवडणूक लढवणार नाही,’ अशी आज राणाभीमदेवी थाटात घोषणा करतात. पण, दीपकेही केजरीवालांच्याच पाऊलावर पाऊल ठेवून आपल्याच शब्दांना गिळतात का, ते भविष्यात स्पष्ट होईलच. तसेच हा प्रश्न आता ‘सीजेपी’च्या बाहेरून नव्हे, तर आंदोलनाशी संबंधित काही तरुणांकडूनच उपस्थित केला गेला. दिल्लीतील आंदोलनात सहभागी झाल्याचे सांगितल्या गेलेल्या काही तरुणांनी दीपकेंच्या निवासस्थानाबाहेर आंदोलन करून ‘आणखी एक केजरीवाल नको’ अशी भूमिका मांडली. ही घटना दीपकेंनी आत्मपरीक्षणाची संधी मानायला हवी. कारण, लोकांना केवळ घोषणा नको आहेत. कालपर्यंत आपण अराजकीय असल्याचे सांगणारे नेतृत्व उद्या राजकीय पक्षाच्या रूपात समोर येणार नाही, याची खात्रीही त्यांना हवी आहे.

त्याचबरोबर दीपकेंच्या वक्तव्यातील आणखीन एक बाबही तितकीच गंभीर. न्यायालये आणि निवडणूक आयोगावरील जनतेचा विश्वास कमी झाल्याचाही दीपकेंनी दावा केला. निवडणूक आयोगाच्या एखाद्या निर्णयावर प्रश्न उपस्थित करणे किंवा न्यायालयाच्या एखाद्या निकालाशी असहमती व्यक्त करणे, हे लोकशाहीविरोधी नाही. मात्र, विशिष्ट निर्णयावर टीका करणे आणि संपूर्ण संस्थेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणे, यात मोठा फरक आहे. म्हणूनच, दीपकेंनी स्पष्ट केले पाहिजे की, त्यांना अभिप्रेत असलेला परिवर्तनाचा नेमका मार्ग कोणता? दीपकेंना निवडणूकही लढवायची नाही, त्यांना राजकीय पक्षही स्थापन करायचा नाही, निवडणूक आयोगावरील यांचा विश्वासही कमी झाला आहे आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वासही ढासळल्याचे म्हणायचे; तर मग व्यवस्था परिवर्तन कोणत्या घटनात्मक माध्यमातून घडवायचे? रस्त्यावरचे आंदोलन हे लोकशाहीचे एक साधन आहे; पण ते लोकशाही व्यवस्थेचा पर्याय होऊ शकत नाही. लोकशाहीमध्ये बदलाचा अंतिम मार्ग मतपेटी, संसद, विधिमंडळ, न्यायालये आणि अन्य घटनात्मक संस्थांमधूनच जातो. पण, हे अमान्य करुन, लोकशाही व्यवस्थेलाच खिळखिळे करण्याचा, लोकशाहीलाच अशा आंदोलनातून पर्याय उभारण्याचा प्रयत्न हा चिंताजनकच. तसेच संसदेत गदारोळ, सरकारवर बेछूट आरोप आणि समाजमाध्यमांवर ‘फेक नॅरेटिव्ह’ उभा करण्यापलीकडे तरुणांच्या प्रश्नांवर सातत्यपूर्ण आणि परिणामकारक राजकीय लढा उभारण्यात आपण कमी पडलो आहोत का, याचे आत्मपरीक्षण काँग्रेसनेही करायला हवे. ‘सीजेपी’च्या वाढीला केवळ एका व्यक्तीच्या महत्त्वाकांक्षेची कथा मानण्यापेक्षा प्रस्थापित विरोधी राजकारणातील पोकळीचे लक्षण म्हणूनही त्याकडे बघायला हवे. दीपकेंची खरी परीक्षा आता सुरू होणार आहे. तरुणांच्या असंतोषाला आवाज देणे सोपे असते; त्याचे विधायक शक्तीत रूपांतर करणे अवघड असते. आंदोलनाच्या व्यासपीठावर देशविरोधी, धर्मद्वेषी किंवा हिंसक प्रवृत्ती घुसण्याचा प्रयत्न करत असतील, तर त्यांना बाहेरचा रस्ता दाखवण्याची जबाबदारीही नेतृत्वाचीच असते. दिल्लीतील आंदोलनात ज्या ‘जेन-झी’ला भडकवले गेले, त्यांच्याशी पंतप्रधान मोदींनी थेट ‘इन्स्टाग्राम’च्या माध्यमातून संवाद साधत, त्यांना विश्वासात घेतले. त्यांच्या संवादाला विक्रमी प्रतिसादही मिळाला. काल सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनीही ‘जेन-झी’शी झालेल्या संवादातून असेच संकेत दिले आहेत. म्हणजेच, केंद्र सरकार युवावर्गाच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे यातून दिसून येते.

एकूणच काय तर, खरोखर दीपके राजकीय पक्ष स्थापन करणार नसतील, निवडणुकीच्या रिंगणात उतरणार नसतील, आणि तरुणांच्या प्रश्नांसाठी शांततापूर्ण, सनदशीर आणि रचनात्मक मार्गानेच काम करणार असतील, तर त्यांनी ते जरूर करावे. मात्र, आजचे अराजकीय आंदोलन उद्याच्या राजकीय पक्षाची रंगीत तालीम ठरणार असेल, तर जनतेला अण्णा आंदोलनापासून आम आदमी पार्टीपर्यंतचा इतिहास आठवायला फार वेळ लागणार नाही. दीपकेंना म्हणूनच एवढेच सांगावेसे वाटते की, तुम्ही खरे बोलत असाल, शब्द पाळणार असाल आणि आंदोलनाच्या नावाखाली अराजकवादाला खतपाणी देणार नसाल तर ठीक! पण, या घोषणेमागे आंदोलनातून देश पेटवून, उद्याच्या राजकारणाची पोळी भाजण्याची तयारी दडलेली असेल, तर जनता आता पूर्वीसारखी भाबडी राहिलेली नाही. त्यामुळे दीपके, काळच तुमच्या शब्दांची खरी परीक्षा घेईल!

# बालचित्रकलेतून उमटली विद्यार्थ्यांची सर्जनशीलता;
## कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या स्पर्धेत १४,०२५ विद्यार्थी सहभागी







**श्रीकांत खुपेरकर**
**कल्याण,** द्यिार्थ्यांच्या कलागुणांना आणि सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली बालचित्रकला स्पर्धा शनिवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. महापालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या आणि विविध व्यवस्थापनांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घेतला.या स्पर्धेसाठी तब्बल १४,०२५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. ठाणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रांच्या तुलनेत कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातून सर्वाधिक विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळावी आणि चित्रकलेच्या माध्यमातून त्यांना आपल्या भावना व कल्पना व्यक्त करता याव्यात, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेपूर्वी विद्यार्थ्यांना नियम, अटी आणि आवश्यक मार्गदर्शन देण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आपल्या चित्रांमधून कल्पकता आणि कलात्मकता साकारली.स्पर्धा चार गटांत घेण्यात आली. पहिली ते दुसरी, तिसरी ते चौथी, पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी अशा चार गटांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे नियोजन करण्यात आले.

प्रशासन अधिकारी भारत बोरनारे यांनीही महापालिका क्षेत्रातील शाळांमधून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले.शिक्षण विभागातील अधिकारी, समूहसाधन केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

त्यांच्या नियोजनामुळे महापालिका क्षेत्रातील शाळांमध्ये स्पर्धा शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणाऱ्या अशा उपक्रमांमुळे त्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळून सर्वांगीण विकासाला हातभार लागतो, असा विश्वास शिक्षण विभागाच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

# गणेशोत्सवासाठी पश्चिम रेल्वेच्या विशेष गाड्या




**श्रीकांत खुपेरकर**
**मुंबई,** गणेशोत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन पश्चिम रेल्वेने विविध मार्गांवर विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे.या विशेष गाड्यांमध्ये मुंबई सेंट्रल–ठोकूर, मुंबई सेंट्रल–सावंतवाडी रोड, वांद्रे टर्मिनस–रत्नागिरी, वलसाड–रत्नागिरी, उधना–रत्नागिरी, वडोदरा–रत्नागिरी आणि विश्वामित्री–रत्नागिरी मार्गांचा समावेश आहे.

या गाड्या ११ ते २४ सप्टेंबर २०२६ दरम्यान विविध तारखांना धावणार आहेत. संबंधित गाड्यांनुसार पनवेल, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ आणि सावंतवाडी रोड आदी प्रमुख स्थानकांवर थांबे असतील.बहुतांश विशेष गाड्यांमध्ये एसी ३-टियर, स्लीपर आणि जनरल सेकंड क्लास डबे असतील. वांद्रे टर्मिनस–रत्नागिरी अनारक्षित विशेष गाडीत जनरल सेकंड क्लास डबे असतील.या विशेष गाड्यांचे आरक्षण ९ ऑगस्ट २०२६ पासून पीआरएस केंद्रांवर तसेच आयआरसीटीसीमार्फत सुरू होईल. या गाड्या विशेष भाड्याने चालविण्यात येणार आहेत.

# रायगडच्या जिल्हा परिषद शाळांमध्ये जूनपासून पोषण आहाराचा तुटवडा; विद्यार्थी वंचित



**श्रीकांत खुपेरकर**
**कर्जत,** रायगड जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये जून महिन्यापासून शालेय पोषण आहाराचा पुरवठा झालेला नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत मिळणाऱ्या पोषण आहारापासून वंचित राहावे लागत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि पोषणाशी संबंधित हा महत्त्वाचा प्रश्न असल्याने पालक आणि नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत पौष्टिक आहार मिळावा, शाळेतील उपस्थिती वाढावी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना पोषण मिळावे, या उद्देशाने शालेय पोषण आहार योजना राबवली जाते. मात्र, जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये जूनपासून आवश्यक धान्य आणि इतर साहित्य उपलब्ध नसल्याचे सांगण्यात येत आहे.यामुळे विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.याबाबत पंचायत समिती कर्जतचे गटशिक्षणाधिकारी अनंत खैरे यांनी सांगितले की, रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित पुरवठादाराला पोषण आहाराचा पुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत. दोन दिवसांत शालेय पोषण आहाराचा पुरवठा सुरळीत सुरू होईल, असे त्यांनी सांगितले.पोषण आहाराचा करारनामा झालेला असून, शाळांमध्ये धान्य आणि इतर आवश्यक साहित्य पोहोचवण्यास दोन दिवसांत सुरुवात होणार आहे. त्यामुळे सध्या निर्माण झालेली अडचण लवकरच दूर होण्याची शक्यता आहे.भविष्यात पोषण आहाराचा पुरवठा नियमित राहावा आणि विद्यार्थ्यांना अशा अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन करावे, अशी अपेक्षा पालक आणि नागरिकांकडून व्यक्त होत आहे. प्रशासनाच्या आश्वासनानुसार दोन दिवसांत शाळांमध्ये पुरवठा प्रत्यक्ष सुरू होतो का, याकडे पालक, विद्यार्थी आणि शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

# स्वर गंधार आणि आलाप आर्ट फॅक्टरीच्या संयुक्त उपक्रमाने बोरीवली येथे भव्य म्युझिकल प्रोग्रॅम संपन्न

**मुंबई,** मुंबईतील बोरीवली येथील ठाकरे हॉलमध्ये काल रात्री ₹स्वर गंधार₹ आणि ₹आलाप आर्ट स्टुडिओ₹ द्वारे आयोजित भव्य ₹म्युझिकल प्रोग्रॅम₹चे आयोजन करण्यात आले होते. संगीतप्रेमींसाठी हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.या कार्यक्रमात अंबिका झोनचे फाउंडर केतन गांधी आणि म्युझिकल शोजचे प्रसिद्ध आयोजक विशाल रास्कर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी कलाकारांना प्रोत्साहित केले आणि आयोजनाचे कौतुक केले.स्पेशल गेस्ट सिंगर्स रवि कडाली आणि विरल भगत यांच्या गाण्यांवर प्रेक्षकांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

त्यांच्या गाण्यांनी संपूर्ण हॉलमध्ये जलशाचा माहोल निर्माण केला होता.कार्यक्रमात नीतिन कामले, प्रियंका मुखर्जी, मंजू गोस्वामी, नितीन के., जयश्री डिसूझा, विशिता संघवी, देवांग मेहता, भक्ती पांचाल यांसह गायक-कलाकारांनी आपल्या मधुर कंठाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. भूपेंद्र सोलंकी यांनी दिलेल्या उत्तम म्युझिक आणि साऊंड-लाइटिंगमुळे कार्यक्रमाची शोभा वाढली. हॉल खचाखच भरला होता.कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन अवस्थी जी यांनी केले.

त्यांच्या विनोदी आणि सुमधुर अँकरिंगने प्रेक्षकांना खिळवून ठेवले.या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते दिलीप देसाई विशेष उपस्थित होते. कार्यक्रमात आयोजक गौरांग जानी यांच्याद्वारे ₹वात्सल्य फाउंडेशन₹ ची घोषणा करण्यात आली. हे फाउंडेशन माता-पित्यांना समर्पित असेल आणि मुलांच्या शालेय उपक्रमांसाठी कार्य करेल.कार्यक्रमाचे आयोजक गौरांग जानी आणि संतन डिसूझा यांनी मेलोडियस गाण्यांच्या उत्कृष्ट निवडीने प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या आयोजनामुळे लोकांनी असे कार्यक्रम पुन्हा पाहण्याची इच्छा व्यक्त केली.आयोजकांनी सांगितले की, ₹संगीताद्वारे लोकांना आनंद देणे आणि त्याचबरोबर सामाजिक जबाबदारी पार पाडणे हा आमचा उद्देश आहे.₹कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व कलाकार, पाहुणे आणि प्रेक्षकांचे आभार व्यक्त करण्यात आले.



**केतन गांधी आणि विशाल रास्कर होते प्रमुख पाहुणे, कलाकारांनी रंगवला संगीतमय जलसा वात्सल्य फाउंडेशनची घोषणा, सामाजिक कार्याला मिळाले प्रोत्साहन**

# शाळकरी विद्यार्थीनींच्या 'खड्डे रिपोर्टिंग'ने कोंदिवडे रस्त्याच्या दुरवस्थेकडे लक्ष





**श्रीकांत खुपेरकर**
**कर्जत,** कर्जत तालुक्यातील कोंदिवडे गावाला जोडणाऱ्या रस्त्याची मोठी दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, या मार्गावरून प्रवास करणे धोकादायक झाले आहे. वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत असून, शाळकरी विद्यार्थ्यांना या रस्त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.रस्त्याच्या दुरवस्थेकडे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी कोंदिवडे गावातील काही शाळकरी विद्यार्थीनींनी हास्यविनोदाच्या माध्यमातून रस्त्याचे 'रिपोर्टिंग' करणारा व्हिडिओ तयार केला. हा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित झाल्यानंतर कर्जत तालुक्यात त्याची चर्चा सुरू झाली आहे.या व्हिडिओमध्ये एका विद्यार्थिनीने हातात छत्री घेऊन रिपोर्टरची भूमिका केली आहे. ती ज्योत्स्ना नावाच्या विद्यार्थिनीला रस्त्याची परिस्थिती सांगण्यास सांगते.ज्योत्स्ना विनोदी पद्धतीने सांगते की, हा रस्ता एखाद्या द्रुतगती महामार्गासारखा आहे. त्यानंतर ती रस्त्यावरील मोठे खड्डे दाखवत, "रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ता आहे, हेच समजत नाही," अशा मिश्कील शब्दांत रस्त्याची अवस्था मांडते.विद्यार्थिनींनी हा विषय विनोदी पद्धतीने मांडला असला तरी रस्त्याची समस्या गंभीर आहे. खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान होण्याबरोबरच दुचाकीस्वारांच्या अपघाताचा धोका वाढला आहे. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने त्यांची खोली लक्षात येत नाही आणि त्यामुळे अपघाताचा धोका आणखी वाढतो.नेहा घारे, मानसी पवार, ज्योत्स्ना आणि इतर शाळकरी विद्यार्थीनींनी हा व्हिडिओ तयार करून सोशल मीडियावर प्रसारित केला आहे. आपल्या गावातील दैनंदिन समस्या हास्यविनोदातून मांडून त्यांनी या महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.लहान वयात गावातील समस्येची जाणीव ठेवून त्यावर आवाज उठविणाऱ्या या विद्यार्थीनींचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.कोंदिवडे गावाला जोडणाऱ्या रस्त्याची दुरवस्था ही केवळ वाहनचालकांची समस्या नसून ग्रामस्थ, विद्यार्थी, महिला आणि शेतकरी यांनाही त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.आता या विद्यार्थीनींच्या 'रिपोर्टिंग'ची दखल घेऊन आमदार, खासदार, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि संबंधित प्रशासन रस्त्याच्या समस्येकडे गांभीर्याने पाहणार का, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.ग्रामस्थांनी संबंधित प्रशासनाने रस्त्याची तातडीने पाहणी करून खड्डे बुजवावेत आणि रस्ता सुरक्षित करावा, अशी मागणी केली आहे.शाळकरी विद्यार्थीनींच्या या कल्पक 'रिपोर्टिंग'मुळे कोंदिवडे रस्त्याची समस्या चर्चेत आली आहे. आता लोकप्रतिनिधी आणि प्रशासन प्रत्यक्षात रस्त्याची डागडुजी करून नागरिकांना दिलासा देणार का, याकडे कर्जत तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## अकुम्सतर्फे आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत उत्कृष्ट कामगिरीची नोंद;
# उत्पन्नात वार्षिक १४.९ टक्के वाढ

**मुंबई/नवी दिल्ली,** भारतातील सर्वात मोठी कंत्राटी विकास आणि निर्मिती संस्था (सीडीएमओ) असलेल्या 'अकुम्स ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्स लिमिटेड'ने ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीचे एकत्रित आर्थिक निकाल जाहीर केले असून, आर्थिक वर्ष २०२७ ची दमदार सुरुवात केली आहे. कंत्राटी निर्मिती व्यवसायातील सातत्यपूर्ण गती, सुधारलेली कार्यक्षमता आणि ग्राहकांकडून असलेली मजबूत मागणी याच्या बळावर कंपनीने महसूल, महसुली नफा आणि निव्वळ नफ्यात उत्तम वाढ नोंदवली आहे.अकुम्सने आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत १,१६७ कोटी रुपयांचा महसूल नोंदवला आहे, जो आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीतील १,०२४ कोटी रुपयांच्या तुलनेत १३.९ टक्के जास्त आहे. व
्याज, कर आणि घसारापूर्व नफा वार्षिक ३५.४ टक्क्यांनी वाढून१७५ कोटी रुपयांवर गेला आहे. तर नफ्याचे प्रमाण १२.६ टक्क्यांवरून १५.० टक्क्यांपर्यंत सुधारले आहे. करोत्तर नफा १०१ कोटी रुपये झाला आहे. गेल्या वर्षाच्या याच तिमाहीत ६५ कोटी रुपयांचा नफा झाला होता. निव्वळ नफ्याचे प्रमाणही ६.२ टक्क्यांवरून वरून ८.४ टक्क्यांवर पोहोचले आहे.या तिमाहीत कंत्राटी निर्मिती व्यवसाय हा वाढीचा मुख्य चालक राहिला. कंत्राटी निर्मिती व्यवसायातील महसूल ९६४ रुपयांपर्यंत वाढला. गेल्या वर्षी याच तिमाहीत ८१३ कोटी रुपयांचा महसूल मिळाला होता. सातत्यपूर्ण उत्पादन वाढ आणि औषधी घटकांच्या किमतीतील सुधारणेमुळे या विभागाचा घसारापूर्व नफा ११९ कोटींवरून ३६.८ टक्क्यांनी वाढून १६३ कोटी रुपयांवर पोहोचला.

निकालांवर भाष्य करताना व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव जैन म्हणाले, ₹आर्थिक वर्ष २०२७ ची सुरुवात अत्यंत मजबूत आणि उत्साहवर्धक झाली आहे. कंत्राटी निर्मिती व्यवसायातील सातत्यपूर्ण कामगिरी ही बाजारातील उत्तम मागणी तसेच अकुम्सवर आमच्या ग्राहकांनी पसंतचा निर्मिती भागीदार म्हणून दाखवलेला विश्वास दर्शवते.₹व्यवस्थापकीय संचालक श्री. संदीप जैन पुढे म्हणाले, कंत्राटी निर्मिती क्षेत्रातील आमचे नेतृत्व अधिक मजबूत करणे, उच्च मूल्याच्या क्षमतेचा विस्तार करणे आणि कार्यक्षमतेत उत्कृष्टता आणणे यावर आमचा भर कायम आहे. भक्कम भविष्यकालीन नियोजन आणि योग्य भांडवल वितरणाच्या जोरावर आगामी वर्षांत शाश्वत वाढ साध्य करण्यासाठी आम्ही पूर्णपणे सज्ज आहोत.

# सायन पुलाच्या पुनर्बांधणीच्या कामाला मोठे यश




**श्रीकांत खुपेरकर**
**मुंबई,** मध्य रेल्वेने सायन पुलाच्या पुनर्बांधणीच्या कामात महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. दुसऱ्या ५०० टन वजनाच्या स्टील गर्डरचे यशस्वी लॉन्चिंग पूर्ण करण्यात आले आहे.प्रत्येकी सुमारे ५४.५ मीटर लांबीचे दोन्ही मुख्य गर्डर केवळ दोन दिवसांत, दोन स्वतंत्र तीन तासांच्या रात्रीच्या ब्लॉकमध्ये यशस्वीपणे बसवण्यात आले.

कार्यरत रेल्वे मार्गावर हे आव्हानात्मक काम अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आणि कडक सुरक्षा उपायांसह करण्यात आले. त्यामुळे उपनगरीय रेल्वे सेवांवरील परिणाम कमीत कमी ठेवण्यात आला.सायन पुलाची पुनर्बांधणी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस –कुर्ला ५वी आणि ६वी मार्गिका प्रकल्पाचा एक भाग आहे. नवीन ROB चा वाढवलेला रेल्वे स्पॅन प्रस्तावित अतिरिक्त रेल्वे मार्गिकांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.दोन्ही मुख्य गर्डर बसवण्यात आल्याने आता डेक स्लॅब, रस्त्याचे अप्रोच, रस्त्याचे डांबरीकरण आणि क्रॅश बॅरिअर यांसारख्या पुढील कामांना सुरुवात होणार आहे.नवीन सायन पुलाची पूर्ण झाल्यानंतर ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, लाल बहादूर शास्त्री रोड आणि धारावी रोड यांना जोडणारी महत्त्वाची पूर्व-पश्चिम वाहतूक व्यवस्था पुन्हा उपलब्ध होईल आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल.

# आर्थर रोड जेलजवळ अवैध आय-बीम उभारणी

**मुंबई.** मुंबईतील आर्थर रोड जेलजवळील जे.आर. बोरिचा मार्ग येथे महापालिकेच्या ड्रेनेज लाईनचे नुकसान करून अनधिकृतपणे स्टीलचे आय–बीम उभारल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी मुंबई महापालिकेच्या 'जी/दक्षिण' प्रभागाच्या सहाय्यक अभियंत्यांनी (दुरुस्ती) ॲग्रीपाडा पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना पत्र लिहून कारवाईची मागणी केली आहे. जे.आर. बोरिचा मार्ग परिसरातील रहिवाशांकडून अज्ञातांनी पत्रे लावण्यासाठी अवैध आय–बीम उभारल्याच्या तक्रारी पालिकेकडे आल्या होत्या. अधिकाऱ्यांनी जाऊन पाहणी केली असता, महापालिकेची पूर्वपरवानगी न घेता हे बांधकाम करण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसकडून निषेध मोर्चा
# सपकाळ यांना पदावरून दूर करा : प्रमोद हिंदुराव

**शहापूर, (वा.)** शहापूर पंचायत समिती शिवतीर्थ येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत भारतीय काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व काँग्रेस पक्ष यांच्याकडून कथितरित्या अवमानकारक शब्दाचा वापर करण्यात आल्याबद्दल ठाणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव म्हणाले, लोकशाही व्यवस्थेमध्ये मतभेद व्यक्त करण्याचा अधिकार सर्वांना असला, तरी सार्वजनिक जीवनातील कोणत्याही व्यक्तीविषयी अवमानकारक, अपमानास्पद किंवा अशोभनीय भाषा वापरणे हे लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवणारे आहे. सभ्य राजकीय संवाद राखणे ही सर्व राजकीय पक्ष आणि पदाधिकाऱ्यांची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येकाने आपले भान ठेवून महिलांच्या विषयी आदरभाव राखून वक्तव्य करणे गरजेचे आहे. हर्षवर्धन सपकाळ यांना प्रदेशाध्यक्ष पदावरून तातडीने हटवण्याची मागणी करणार असल्याचे त्यांनी जाहीरपणे




## मोर्चावेळी पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सरचिटणीस संजय तिवरे, प्रदेश चिटणीस डी.के.विशे, ठाणे ग्रामीणचे अध्यक्ष किसन तारमळे, जिल्हा महिलाध्यक्षा कल्पना तारमळे, तालुकाध्यक्ष डॉ. मनोहर सासे, कल्याण तालुकाध्यक्ष बाळाराम कोर, मुरबाड तालुकाध्यक्ष चंद्रकांत बोस्टे, भिवंडी तालुकाध्यक्ष विजय पाटील, कैलास घरत, दिलशान शेख, विजय मौर्य, तुकाराम वेखंडे,अरुण मांजे, दीपक लकडे, कविता विशे, सविता मोरघे, सिद्धार्थ शिंदे तसेच विविध सेल अध्यक्ष व मोठ्या संख्येने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# बदलापूरच्या रस्त्यांवर केवळ मलमपट्टीच !
## 'जोर का झटका धीरे से लगे'चा येतोय अनुभव



**बदलापूर (वा.)** गेल्या काही दिवसांपासून दुरवस्था झालेल्या बदलापूरच्या रस्त्यांची अखेर कुळगाव बदलापूर नगर परिषदेने डागडुजी केली आहे. मात्र तंत्रशुद्ध पद्धतीचा अवलंब न करता करण्यात आलेली ही डागडुजी एक प्रकारची मलमपट्टीच ठरली आहे. त्यामुळे नागरिकांना आता 'जोर का झटका धीरे से लगे' असा अनुभव येत आहे. बदलापूर शहराच्या पूर्व-पश्चिम भागात वाहनाने येजा करण्यासाठी जुन्या नगर परिषद कार्यालयासमोरून जाणारा उड्डाणपूल हा एकमेव उड्डाणपूल आहे. दररोज हजारो वाहने या उड्डाणपुलावरून ये-जा करीत असतात. त्यामध्ये रिक्षा, दुचाकी, हलकी व अवजड चारचाकी वाहने तसेच स्कूल बसचाही समावेश असतो. त्यामुळे हा रस्ता खड्डेमुक्त असणे आवश्यक असते. दरवर्षी विशेषतः पावसाळ्यात हा रस्ता खड्डेमय होत असल्याने नगर परिषद प्रशासन टीकेचे लक्ष्य ठरत असते. या पार्श्वभूमीवर नगर परिषद प्रशासनाने पावसाळ्यापूर्वीच या खड्ड्यांची तंत्रशुद्ध पद्धतीने डागडुजी करणे अपेक्षित होते, परंतु रस्त्याच्या डागडुजीकडे दुर्लक्ष झाल्याने पाऊस सुरू होऊन जेमतेम महिना उलटताच या रस्त्याची खड्ड्यांमुळे दुरवस्था झाली.

## उपरोधिक आंदोलन

- नागरिकांच्या या भावना लक्षात घेऊन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने उड्डाणपुलाजवळील लाडक्या खड्ड्याचा वाढदिवस साजरा करण्याचे उपरोधिक आंदोलन करून या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते.
- तर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने खड्डे भरता येत नसतील तर लोकप्रतिनिधींनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली होती. त्यानंतर नगर परिषद प्रशासनाने उड्डाणपुलासह अन्य रस्त्यांवरील खड्डे भरल्याने नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. बदलापुरात दरवर्षी पावसाळ्यात खड्डे भरले की अल्पावधीत पुन्हा तयार होतात. हा बदलापूरकरांचा गेल्या अनेक वर्षांपासूनचा अनुभव आहे. मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांची कार्यपद्धती पाहता त्यांच्या कार्यकाळात खड्डे भरण्याचा हा ₹बदलापूर पॅटर्न₹ बदलेल अशी अपेक्षा होती. मात्र ₹मुख्याधिकारी जोमात, पण बांधकाम विभाग कोमात₹ अशी अवस्था असल्याने तंत्रशुद्ध पद्धतीने खड्डे न भरता थातूरमातूर पद्धतीने खड्डे भरून मलमपट्टी करण्यात आल्याचे मत शहरातील सुजाण नागरिक व्यक्त करीत आहेत.

**संभ्रमावस्था**

## मासेमारी सुरू करायची तरी कधी; भाईंदरच्या पारंपरिक व लहान मच्छिमारांचा संभ्रम कायम
# १२ सागरी मैलापर्यंत मासेमारीला बंदी अद्याप कायम

**भाईंदर (वा.)** केंद्र शासनाने १ ऑगस्टपासून खोल समुद्रातील म्हणजेच किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपुढील क्षेत्रात मासेमारीला परवानगी दिली असली, तरी भाईंदरच्या उत्तन, पाली आणि चौक परिसरातील पारंपरिक व लहान मच्छीमारांमध्ये अद्याप संभ्रमाचे वातावरण आहे. किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपर्यंतच्या प्रादेशिक जलक्षेत्रात महाराष्ट्र शासनाची मासेमारीबंदी १५ ऑगस्टपर्यंत कायम असल्याने मासेमारीला सुरुवात कधी करायची, असा सवाल स्थानिक मच्छीमारांकडून उपस्थित केला जात आहे. केंद्र शासनाच्या नियमानुसार खोल समुद्रातील विशेष आर्थिक क्षेत्रात ३१ जुलैपर्यंत मासेमारीबंदी होती.



## लहान बोटी; लाभ घेता येत नाही

महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील प्रादेशिक जलक्षेत्रात १५ ऑगस्टपर्यंत मासेमारीवर बंदी असल्याने स्थानिक पारंपरिक मच्छीमारांसमोर वेगळीच अडचण निर्माण झाली आहे. उत्तन, पाली आणि चौक परिसरातील अनेक मच्छीमार पारंपरिक पद्धतीने लहान बोटींच्या माध्यमातून मासेमारी करतात. या बोटींची क्षमता मर्यादित असल्याने १२ सागरी मैलांपुढील खोल समुद्रात जाणे अनेक लहान मच्छीमारांना शक्य नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

## कारवाईच्या भीतीने सध्या बोटी किनाऱ्यावरच

किनाऱ्यालगतच्या भागात मासेमारी करण्याचा प्रयत्न केल्यास कारवाईची भीती असल्याने मच्छीमारांनी सध्या बोटी किनाऱ्यावरच ठेवणे पसंत केले आहे. मच्छीमारांच्या म्हणण्यानुसार, मासेमारीबंदीच्या कालावधीत आधीच उत्पन्नाचा मोठा स्रोत बंद असतो. त्यानंतर मासेमारी सुरू होण्याची प्रतीक्षा असतानाच १२ सागरी मैलांपर्यंतची बंदी कायम असल्याने आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. आमच्याकडे खोल समुद्रात जाण्यासाठी मोठ्या बोटी नाहीत. त्यामुळे आमच्यासाठी मासेमारी प्रत्यक्षात १५ ऑगस्टनंतरच सुरू होणार आहे, मात्र तोपर्यंत कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, असा प्रश्न मच्छीमारांनी उपस्थित केला आहे.

## शासनाने स्पष्ट आदेश द्यावेत

मासेमारी सुरू करण्याच्या तारखेबाबत निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासाठी शासनाने तातडीने स्पष्ट मार्गदर्शक सूचना जाहीर कराव्यात, अशी मागणी मच्छीमारांकडून करण्यात आली आहे. विशेषत: लहान व पारंपरिक मच्छीमारांसाठी स्वतंत्र नियम अथवा सवलतींचा विचार करावा, अशीही मागणी होत आहे.

मासेमारीबंदीच्या काळात उत्पन्नाचा स्रोत बंद असल्याने लहान मच्छीमारांना आर्थिक मदत किंवा नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे .या प्रश्नावर मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांच्याबद्दलही स्थानिक मच्छीमारांनी नाराजी व्यक्त केली. लहान मच्छीमारांच्या अडचणी लक्षात घेऊन शासनाने स्पष्ट धोरण जाहीर करावे आणि संभ्रमाची स्थिती दूर करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## 'उरणच्या बोटी समुद्रात, आमच्यावर मात्र कारवाई'

- मच्छीमारांनी नियमांच्या अमलबजावणीबाबतही प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांच्या आरोपानुसार, उरणच्या करंजा परिसरातील काही बोटी समुद्रात मासेमारीसाठी जात असल्याचे दिसून येते, मात्र भाईंदर परिसरातील मच्छीमारांनी मासेमारी केल्यास त्यांच्यावर नियमांनुसार कारवाई केली जाते.
- एका भागातील बोटी समुद्रात जात असतील आणि दुसऱ्या भागातील मच्छीमारांवर कारवाई होत असेल, तर नियमांची अमलबजावणी समान पद्धतीने होत आहे का, असा सवाल स्थानिक मच्छीमारांनी उपस्थित केला आहे. या आरोपांची संबंधित

## निवडक

### ऐतिहासिक रेल्वे स्थानकांचे वाढदिवस साजरे होणार

**मुंबई :** मुंबईच्या वैशिष्ट्यपूर्ण रेल्वे इतिहासाचा एक विशेष गौरव सोहळा रंगणार आहे. रेल्वे बोर्डाने 'स्टेशन महोत्सव-बर्थडे सेलिब्रेशन्स' या उपक्रमासाठी शहरातील पाच ऐतिहासिक रेल्वे स्थानकांची निवड केली आहे. दीडशेहून अधिक वर्षांपासून या क्षेत्राच्या विकासाचे साक्षीदार असलेल्या या स्थानकांची स्थापना ज्या दिवशी झाली, त्याच दिवशी त्यांचा वाढदिवस साजरा करून त्यांच्या ऐतिहासिक महत्त्वावर पुन्हा एकदा प्रकाश टाकला जाणार आहे. मध्य रेल्वेवरील १८५४ मध्ये स्थापन झालेल्या कल्याण स्थानकाचा वाढदिवस ९ ऑक्टोबर रोजी साजरा केला जाईल. १८६३ मध्ये स्थापन झालेली कर्जत आणि खंडाळा ही स्थानके अनुक्रमे १४ ऑक्टोबर आणि २३ ऑक्टोबर रोजी आपला वर्धापन दिन साजरा करतील. १८५६ मध्ये स्थापन झालेल्या खोपोली स्थानकाचा वाढदिवस १८ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाईल, तर दुसरीकडे, पश्चिम रेल्वेवरील २८ नोव्हेंबर १८६४ रोजी सुरू झालेल्या वांद्रे स्थानकाचा उत्सव नोव्हेंबर महिन्यात आयोजित केला जाणार आहे.

### 'विधी' चे सुधारित वेळापत्रक

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने ३ व ५ वर्षीय विधी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेशाच्या प्रवेश प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार प्रथम फेरीसाठी महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम ९ ऑगस्टपर्यंत भरता येणार आहेत. ३ वर्षीय विधीचे जागावाटप १२ ऑगस्ट रोजी तर ५ वर्षीय विधीचे जागावाटप १३ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात येईल, तर विधीच्या यादीत ७८ महाविद्यालयाची भर पडल्याने जागांमध्ये वाढ झाली आहे.

### सीएसएमटी, भायखळा येथे बँडचे सादरीकरण

**मुंबई :** स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभर आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष आरपीएफ बँड सादरीकरणाचा एक भाग म्हणून मध्य रेल्वेच्या आरपीएफ बँडकडून मुंबईतील तीन प्रमुख ठिकाणी देशभक्तीपर संगीताचे सादरीकरण करण्यात येणार आहे. मध्य रेल्वेचा आरपीएफ बँड १२ ऑगस्टला दादर रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडील दादर टर्मिनस सर्क्युलेटिंग परिसरात सादरीकरण करणार आहे. त्यानंतर १४ ऑगस्टला भायखळा रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेकडील परिसरात तर स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्टला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील जीएम बिल्डिंग परिसरात अंतिम सादरीकरण होईल. तिन्ही कार्यक्रमांना सायंकाळी ६ वाजता सुरुवात होणार आहे.

### त्रिभाषिक सूचना फलकाची मागणी

**मुंबई :** बृहन्मुंबई महापालिकेच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी आणि दलाल तसेच मध्यस्थांकडून नागरिकांची होणारी कथित फसवणूक रोखण्यासाठी मुंबईतील सर्व २४ प्रशासकीय वॉर्डांमध्ये मराठी, इंग्रजी आणि हिंदी अशा तीन भाषांमध्ये सूचना फलक लावण्याची मागणी नागरिकांनी पालिका प्रशासनाकडे केली आहे. मुंबई महापालिका आयुक्त आणि वरिष्ठ नागरी अधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात, वकील फैयाज शेख ही मागणी करत मुंबई बहुभाषिक शहर असल्याचे म्हटले आहे.

# पदपथांच्या पाहणीत हयगय झाल्यास अभियंते जबाबदार

**'पादचारी प्रथम' या अभियानांतर्गत पालिका प्रशासनाचा इशारा**

**मुंबई :** 'पादचारी प्रथम' या अभियानांतर्गत मुंबईतील फुटपाथ अतिक्रमणमुक्त करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत प्रत्येक विभागातील किमान १० टक्के पदपथांची दर महिन्याला पाहणी करावी. मंजूर आराखड्यानुसार कोणतीही तफावत आढळल्यास निर्धारित मानकांचे पालन करण्यात अपयश आले तर संबंधित रस्ते अभियंता, सहाय्यक अभियंता (परिरक्षण) आणि विभागीय कार्यकारी अभियंते जबाबदार असतील, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे. पादचारी प्रथम अभियानांतर्गत मुंबई महापालिकेने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

मुंबई शहर हे पायी प्रवास करण्यावर भर देणारे असून ५० टक्के मुंबईकरांचा प्रवास पायीच होतो. त्यामुळे फुटपाथ पादचाऱ्यांसाठी सुरक्षित व मोकळे ठेवणे पालिकेची जबाबदारी आहे.



### आयुक्तांकडून दर महिन्याला झाडाझडती

सर्व विभागांच्या कामगिरीचा आढावा महापालिका आयुक्तांच्या मासिक आढावा बैठकीत घेण्यात येईल.

### ...तर अधिकाऱ्यांवर कारवाई करणार

पदपथांची अवस्था सुधारण्यासाठी आता केवळ कारवाई न करता नियमित पाहणी आणि जबाबदारी निश्चित करण्याची यंत्रणा उभी करण्यात आली आहे. त्यामुळे पदपथांच्या देखभालीत हलगर्जी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे.

'पादचारी प्रथम' या अभियानांतर्गत मुंबईतील पदपथ अतिक्रमण मुक्त करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. महापालिकेच्या ६ ऑगस्ट २०२६ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, प्रत्येक विभागातील किमान १० टक्के पदपथांची दर महिन्याला पाहणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या पाहणीत पदपथ मंजूर आराखडा, रचना मानके आणि देखभालीच्या आवश्यकतांनुसार आहेत की नाही, याची तपासणी केली जाणार आहे. मंजूर आराखड्यानुसार तफावत आढळल्यास अभियंत्यांवर सुधारात्मक कारवाईची जबाबदारी निश्चित केली जाईल.

### सहाय्यक आयुक्तांनीही नियमित पाहणी करावी

सहाय्यक आयुक्तांनी आपल्या विभागातील पदपथांची नियमित पाहणी करून ते अतिक्रमण आणि अन्य अडथळ्यांपासून मुक्त राहतील, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक विभागाने पदपथाच्या पाहणी व कारवाईचा साप्ताहिक अहवाल सादर करायचा असून त्यामध्ये पदपथाचे नाव, कारवाईची तारीख, केलेल्या कारवाईचे स्वरूप तसेच कारवाईपूर्वी आणि कारवाईनंतरची छायाचित्रे देणे आवश्यक आहे.

### सर्व प्रकारची अतिक्रमणे हटविणार

पदपथांवरील अनधिकृत बांधकामे, फेरीवाले, अनावश्यक स्ट्रीट फर्निचर, बेवारस साहित्य, जाहिरात फलक, बॅनर तसेच बांधकामाचा राडारोडा हटवण्यावरही या मोहिमेत भर देण्यात आला आहे. रेल्वे, मेट्रो स्थानके, शाळा, कॉलेज, रुग्णालये अन्य वैद्यकीय सुविधा, पालिका व शासकीय कार्यालये, धार्मिक स्थळे या ठिकाणच्या पदपथांना प्राधान्यक्रम दिला आहे. प्राधान्यक्रमातील पदपथांची अतिक्रमणमुक्तीची कार्यवाही १५ दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश आहेत.

### या गोष्टींची अंमलबजावणी करा!

सहाय्यक आयुक्तांनी त्यांच्या विभागातील पदपथांची नियमित पाहणी करून सदर पदपथ अतिक्रमण व इतर अडथळ्यांपासून मुक्त राहतील, यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. प्रत्येक विभागाने साप्ताहिक अहवाल सादर करावा, परिमंडळातील उप आयुक्तांनी साप्ताहिक आढावा घेऊन संबंधित विभागांकडून सादर करण्यात आलेल्या अहवालांची पडताळणी करावी, अतिरिक्त आयुक्तांनी अंमलबजावणीच्या प्रगतीचा दर पंधरवड्याला आढावा घ्यावा.

# सायन पुलासाठी तारीख पे तारीख

## ऑगस्टचा मुहूर्त हुकला, आता प्रतीक्षा सप्टेंबरची

**मुंबई :** सायन पुलाचे काम युद्धपातळीवर सुरू असून पश्चिमेला एक गर्डर लाँच करण्यात आला आहे, तर पूर्वेकडे गर्डर ऑगस्ट महिन्याच्या ८ तारखेला लाँच करण्यात आला आहे. मात्र, गर्डर लाँच केल्यानंतर पुढील प्रक्रियेसाठी मुंबई महापालिकेला ४५ दिवसांचा अवधी मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे १५ व ३० ऑगस्टचा मुहूर्त हुकला असून आता पूल वाहतुकीसाठी खुला होण्यासाठी सप्टेंबर महिन्याची प्रतीक्षा आहे. दरम्यान, विद्याविहार पुलाचे काम जुलै अखेरपर्यंत होणे अपेक्षित होते. मात्र, आता विद्याविहार पूल या दोन्ही पुलांचे काम संथगतीने सुरू असल्याने १५ ऑगस्टला खुला होणारा विद्याविहार पूल सप्टेंबर महिन्यात खुला होण्याची शक्यता आहे.

### मेगा ब्लॉकच्या विलंबामुळे पुलाला उशीर

सायन पूल १५ जुलैपर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, असे आश्वासन पालिका प्रशासनाकडून देण्यात आले होते. त्यानंतर १५ ऑगस्टचा मुहूर्त ठरला होता. मात्र मध्य रेल्वेकडून मेगा ब्लॉकची वेळ निश्चित ठरत नव्हती. मात्र ८ व ९ ऑगस्टच्या मध्यरात्री पूर्वेकडील गर्डर लाँच करण्यात आल्याने पुढील ४५ दिवस मुंबई महापालिकेला उर्वरित कामे करण्यास वेळ लागणार आहे. त्यामुळे सायन पूल वाहतुकीसाठी खुला करण्याबाबत नवीन तारीख समोर आली असून सप्टेंबर अखेरपर्यंत पूल वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजन असल्याचे मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी सांगितले.

# चालकाविरोधात गुन्हा, बस पोलिसांच्या ताब्यात

## मुलुंड येथील बेस्ट बस अपघात प्रकरण

**मुंबई :** मुलुंड डेपोशी संबंधित भाडेतत्त्वावरील बस अपघातप्रकरणी बसचालकाविरुद्ध आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवारी झालेल्या या अपघाताच्या प्रकरणात शनिवारी, ८ ऑगस्टला मुलुंड पोलीस ठाण्यात विविध कलमांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

मातेश्वरी बसचे बस निरीक्षक कोकणे यांनी या प्रकरणाची माहिती दिली. अपघातानंतर बसचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून चालक आणि संबंधित बस अद्याप पोलिसांच्या ताब्यातच आहेत. या प्रकरणात विरोधी पक्षाकडून चालकाविरुद्ध आक्षेप नोंदवल्यानंतर चालकाची मद्यप्राशनाची तपासणी करण्यात आली. अगरवाल रुग्णालयात ही वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे.

### चालकावर पुढील कारवाई सुरू

पीएसआय किशोर पानसरे यांनी चालक तसेच अपघातग्रस्त बस ९ ऑगस्टला सकाळी ९ वाजेपर्यंत पोलिसांच्या ताब्यात ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.



# एमएमसीकडून तक्रारींच्या निवारणाला गती

### ४३ प्रकरणे निकाली, मात्र ८४९ तक्रारी प्रलंबित




गेल्या अनेक वर्षांच्या संथ कारभारानंतर महाराष्ट्र मेडिकल काऊन्सिलने (एमएमसी) तक्रार निवारण प्रक्रियेचा वेग वाढवला आहे. काऊन्सिलने जुलै २०२६ च्या पहिल्याच आठवड्यात ४३ तक्रारी निकाली काढल्या असून ही अलीकडच्या वर्षांतील सर्वात मोठी वार्षिक निपटारा संख्या ठरली आहे. मात्र, गती वाढूनही काऊन्सिलकडे तब्बल ८४९ प्रलंबित तक्रारींचे डोंगर साचले असून वैद्यकीय दुर्लक्ष आणि व्यावसायिक गैरवर्तनाचा आरोप असलेल्या डॉक्टरांवर जलद कारवाईची गरज अधोरेखित होत आहे.

अधिकृत आकडेवारीनुसार, २०२२ ते जुलै २०२६ दरम्यान एमएमसीकडे ३०१ नवीन तक्रारी प्राप्त झाल्या. यामध्ये वैद्यकीय निष्काळजीपणामुळे रुग्णाचा मृत्यू होणे, जास्त शुल्क आकारणे, बनावट वैद्यकीय प्रमाणपत्रे देणे, अनैतिक वर्तन आणि अपूर्ण उपचारांशी संबंधित गंभीर आरोपांचा समावेश आहे. काऊन्सिलने २०२२ मध्ये अवघ्या दोन तक्रारी निकाली काढल्या होत्या, तर २०२३ आणि २०२४ मध्ये एकही प्रकरण मार्गी लागले नव्हते. २०२५ मध्ये २५ प्रकरणे निकाली काढून परिस्थितीत सुधारणा झाली, तर या वर्षी जुलैपर्यंत ४३ तक्रारींचा निपटारा करून या प्रक्रियेला अधिक गती मिळाली आहे.

### वर्षानुवर्षे सुनावणीच नाही

पश्चिम उपनगरातील एका हॉस्पिटलमधील डॉक्टर जेनेरिक औषधे लिहून देत नाहीत आणि विशिष्ट रक्तपेढीतूनच रक्त चढवण्यास भाग पाडतात, अशी २०१७ मध्ये दाखल झालेली तक्रार नऊ वर्षांनंतरही प्रलंबित आहे. तक्रारदार स्वत: वैद्यकीय क्षेत्रातील असून संबंधित डॉक्टरला नोटीस बजावूनही ९ वर्षांनंतरही एकही सुनावणी झालेली नाही. पदवी नसलेल्या पॅथॉलॉजिस्टविरोधात तक्रार केली होती. ती आजही प्रलंबित असल्याचे आरोग्य कार्यकर्ते चेतन कोठारी यांनी सांगितले.

### गोविंदा रे गोपाळा...



श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या पार्श्वभूमीवर, मुंबईत ठिकठिकाणी दहीहंडीचा सराव सुरू आहे. मुंबई सेंट्रल येथे गोविंदा मंडळाने मानवी मनोरा रचून जोरदार सराव केला. (छाया : सलमान अन्सारी)

## आरोग्य विभागातील पदभरती, पदोन्नतीला वेग!

**मुंबई :** आरोग्य विभागातील रिक्त पदे, रखडलेल्या पदभरत्या आणि वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या पदोन्नतीच्या प्रक्रियेला आता गती दिली जाणार आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित कामात दिरंगाई खपवून घेणार नाही, असा इशारा देत सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी पदभरती आणि पदोन्नतीच्या प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले. फाईलचा प्रवास जलद करा, प्रत्येक स्तरावर जबाबदारी निश्चित करा, असे निर्देशही त्यांनी दिले.

सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आरोग्य भवन येथे झालेल्या आस्थापना विषयक बैठकीत विभागातील विविध संवर्गांतील रिक्त पदे, पदभरती, पदोन्नती आणि कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांचा सविस्तर आढावा घेतला. प्रशासनातील निर्णय प्रक्रिया गतिमान करून नागरिकांना वेळेत आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

# दारू उत्पादकांची उच्च न्यायालयात धाव



## मॅकडोवेल्स, ओल्ड मंकने बंदीविरोधात दिले आव्हान

मॅकडोवेल्स नं. १ सेलिब्रेशन मॅच्युअर्ड रम आणि ओल्ड मंक या लोकप्रिय ब्रँड्सच्या निर्मितीवर आणि विक्रीवर अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने (एफएसएसएआय) घातलेल्या बंदीविरोधात युनायटेड स्पिरिट्स लिमिटेड आणि मोहन मेकिन लिमिटेड या दारू उत्पादक कंपन्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. उत्पादक घटकांच्या तपासणीनंतर एफएसएसएआयने लेबलिंग, घटकांची रचना आणि फ्लेवरिंग एजंट्सच्या वापरावर आक्षेप घेत हे बंदीचे आदेश दिले होते. या आदेशांना कंपन्यांनी न्यायालयात आव्हान दिले आहे.

प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अनखड यांच्या खंडपीठासमोर युनायटेड स्पिरिट्सतर्फे ज्येष्ठ वकील बिरेन्द सराफ यांनी बाजू मांडली. प्राधिकरणाच्या या कारवाईमुळे 'भारतीय बनावटीच्या परदेशी दारू' (आयएमएफएल) उद्योगाचा मोठा भाग प्रभावित झाला आहे आणि या उत्पादनांची निर्मिती गेल्या पाच दशकांपासून एकाच पद्धतीने केली जात आहे, असा युक्तिवाद त्यांनी केला.

### कंपनी करतेय ग्राहकांची दिशाभूल

अशा प्रकारे रातोरात लेबल बदलणे शक्य नसल्याचे स्पष्ट करताना सराफ म्हणाले, उद्या सकाळी मी स्टीकर लावून माझे लेबल बदलू शकत नाही. मी वापरत असलेल्या प्रत्येक लेबलला राज्य उत्पादन शुल्क विभागाची मंजुरी घ्यावी लागते. दुसरीकडे या उत्पादनांमध्ये अनधिकृत कृत्रिम किंवा निसर्ग-समान फ्लेवर्स वापरले गेले आहेत आणि ग्राहकांची दिशाभूल करणारे वर्णन आहे, असा आरोप एफएसएसएआयने केला.

### सार्वजनिक आरोग्यासाठी धोकादायक नाही

याचिकाकर्त्यांनी असा दावा केला आहे की, एफएसएसएआयने लेबलिंग आणि फ्लेवरिंगबाबत आक्षेप घेतले असले तरी त्यांच्या अन्न विश्लेषकाला हे उत्पादन असुरक्षित, रम मानकांचे उल्लंघन करणारे किंवा सार्वजनिक आरोग्यासाठी धोकादायक आढळलेले नाही. हे उत्पादन अन्न सुरक्षा आणि मानके (मद्यपेये) नियम, २०१८ च्या सर्व निकषांची पूर्तता करते. त्यामुळे त्यावर बंदी घालण्याचे कोणतेही कारण नव्हते.

### उद्योगावर ३० टक्के परिणाम

'एफएसएसएआयच्या या कारवाईमुळे आयएमएफएल उद्योगाचा ३० टक्के भाग प्रभावीपणे ठप्प झाला आहे. ही उत्पादने गेल्या ५० हून अधिक वर्षांपासून तयार केली जात आहेत,' असे ॲड. सराफ यांनी न्यायालयाच्या निदर्शनाला आणून दिले. कंपनीने एफएसएसएआयच्या पश्चिम विभागीय कार्यालयाने २९ जूनला जारी केलेल्या बंदीच्या आदेशाला आणि सशर्त बंदीच्या आदेशाला आव्हान दिले आहे.

# सोसायटीच्या माजी पदाधिकारी, विकासकावर गुन्हा दाखल

**मुंबई :** वरळीतील एका दीर्घकाळ प्रलंबित पुनर्विकास प्रकल्पादरम्यान कथित फसवणूक, बनावट दस्तावेज तयार करणे, गुन्हेगारी कट रचणे आणि झोपडीधारकांना बेकायदेशीरपणे निष्कासित केल्याप्रकरणी वरळी पोलिसांनी न्यू सागर विहार नगर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीचे ९ माजी पदाधिकारी तसेच मेसर्स समुद्र रिअल इस्टेट प्रायव्हेट लिमिटेड आणि तिच्या संचालकांविरुद्ध दोन वेगवेगळे एफआयआर दाखल केले आहेत. या एफआयआरमध्ये हुसैन मेहताब साहेब, अब्दुल पटेल, पिराजी वाघमारे, आबिदा बेगम मुल्ला, नंदा उत्तम गायकवाड, नारायण काकडे, करीम शेख, अब्बास सय्यद आणि शांता रेड्डी यांच्यासह मेसर्स समुद्र रिअल इस्टेट प्रा. लि. आणि तिच्या संचालकांची नावे आरोपी म्हणून नोंदवण्यात आली आहेत.

**सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे आयोजन**

# मेगा एमएसएमई क्रेडिट आऊटरीच कॅम्पला प्रतिसाद

**मुंबई :** देशव्यापी मेगा एमएसएमई क्रेडिट आऊटरीच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून सेंट्रल बँक ऑफ इंडियाकडून मुंबई मेट्रो झोनल ऑफिस (एमएमझेडओ) च्या मार्गदर्शनाखाली दादर/माटुंगा येथे मेगा एमएसएमई क्रेडिट आऊटरीच कॅम्पचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे कार्यकारी संचालक मुरली कृष्ण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी झोनल हेड डी. एस. राठोर, रिजनल हेड प्रणव कपूर, रिजनल हेड नवीन ग्रोवर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला उद्योजक, एमएसएमई ग्राहक तसेच व्यावसायिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मुरली कृष्ण यांनी एमएसएमई क्षेत्राच्या विकासासाठी बँकेच्या सातत्यपूर्ण व दृढ बांधिलकीवर प्रकाश टाकला तसेच वेळेवर, सुलभ आणि ग्राहककेंद्रित कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बँकेमार्फत राबवण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. उद्योजकांनी आपल्या व्यवसायाच्या वाढीला चालना देण्यासाठी बँकेच्या विविध एमएसएमई उत्पादनांचा तसेच व्यापक वित्तीय उपाययोजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.




### १८३ कोटींच्या कर्जांना मंजुरी

मेगा एमएसएमई क्रेडिट आऊटरीच कॅम्पदरम्यान बँकेला सुमारे ५७७ कोटींच्या व्यावसायिक क्षमतेचे कर्ज प्रस्ताव/लीड प्राप्त झाले. जलद आणि वेळेवर कर्ज वितरण करण्याच्या बँकेच्या बांधिलकीचे दर्शन घडवत प्राप्त झालेल्या एकूण लीडपैकी १८३ कोटींच्या कर्जांना या कॅम्पदरम्यान मंजुरी देण्यात आली.

## एसएनसीयू अधिक सक्षम करणार

**मुंबई :** राज्यातील नवजात बालकांना वेळेवर, दर्जेदार आणि अत्याधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष नवजात शिशू उपचार कक्ष (एसएनसीयू) अधिक सक्षम करण्यात येणार आहेत. एसएनसीयूमध्ये आवश्यक सुविधा, वैद्यकीय उपकरणे, मनुष्यबळ व पायाभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यात येतील, अशी ग्वाही आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. नवजातांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा तसेच उपचार अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने आरोग्य भवन येथे आबिटकरांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली.

# बनावट खात्यांचे रॅकेट उद्ध्वस्त

## ७.४२ कोटींचे सायबर फ्रॉड उघडकीस

सायबर फसवणुकीच्या उद्देशाने २२ बनावट खाती उघडून त्याद्वारे ७.४२ कोटी रुपयांहून अधिक रकमेचा गैरव्यवहार करणाऱ्या एका टोळीचा खार पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक केली आहे. आरोपींनी टेलिग्रामद्वारे संपर्क साधून त्यांना ऑनलाइन कामाचे आमीष दाखवून त्यांची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

### दोघांना अटक

तांत्रिक विश्लेषण, सायबर हेल्पलाइन क्रमांक १९३० आणि समन्वय पोर्टलच्या मदतीने पोलिसांनी बीड येथील डिलिव्हरी बॉय अविनाश खरात (२५) आणि पिंपरी-चिंचवड येथील डिलिव्हरी बॉय विकास भुजबळ (२४) या दोन आरोपींची ओळख पटवली. यापैकी अविनाश खरात याला अटक करण्यात आली असून विकास भुजबळ आणि इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

### देशभरात सायबर फसवणूक

पोलीस उपायुक्त मोहित कुमार गर्ग यांनी सांगितले, 'मुख्य आरोपीने इतर लोकांची मदत घेऊन ही खाती उघडली. खरातने पुण्याजवळ एक फ्लॅट खरेदी केला होता आणि त्या पत्त्याचा वापर करून २२ बनावट खाती उघडली.

मालक, प्रकाशक आणि संपादक : सौ. नम्रता गोसावी, कार्यालय क्रमांक १०१, पहिला मजला, मयूर पंख, सरस्वत बँकेसमोर, जांबळी नाका, ठाणे (पश्चिम) – ४००६०१, महाराष्ट्र हे प्रकाशन सोमाणी प्रिंटिंग प्रेस येथे छापलेले आहे. युनिट क्रमांक ४, ग्राऊंड फ्लोअर, एन.के. इंडस्ट्रियल इस्टेट, आरे रोडलगत, प्रवासी इंडस्ट्रिज इस्टेटजवळ, गेट क्रमांक २, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०००६३. संपर्क क्रमांक : ९९६७७६६३०३
बातम्यांसाठी संपर्क : ९९६७७६६३०३ जाहिरातींसाठी बुकिंग : ९९६७७६६३०३ आर.एन.आय. क्रमांक : MAHMAR/25/A0856. Email: vartamaharashtra@gmail.com